# पोलीस व्हॅनची वाहनांना धडक

## मद्यधुंद पोलीस हवालदाराविरुद्ध गुन्हा दाखल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पोलीस व्हॅनने चार वाहनांना धडक दिल्याची घटना सदाशिव पेठेतील देशमुखवाडीत नुकतीच घडली. या प्रकरणी मद्यधुंद पोलीस हवालदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदाशिव पेठेतील देशमुखवाडी परिसरातून शुक्रवारी सायंकाळी सातच्या सुमारास व्हॅन निघाली. अरुंद गल्लीत व्हॅनचालकाचे नियंत्रण सुटले. दोन मोटारी, एक टेम्पो, तसेच दुचाकीला व्हॅनने धडक दिली. शुक्रवारी गृहमंत्री अमित शहा हे पुणे दौऱ्यावर आले होते. त्यानिमित्त शहरात दिवसभर बंदोबस्त तैनात केला होता. मोटार परिवहन विभागातील व्हॅन टिळक रस्ता परिसरात आली होती. त्या वेळी टिळक रस्त्यावर कोंडी झाली होती. कोंडी टाळण्यासाठी व्हॅनचालकाने देशमुखवाडीतील गल्लीत व्हॅन नेली. व्हॅनच्या धडकेत काही वाहनांचे नुकसान झाले. धडक दिल्यानंतर देशमुखवाडीतील अरुंद गल्लीतून व्हॅन भिकारदास मारुती मंदिराकडे नेण्यात आली. विश्रामबाग पोलिसांनी व्हॅनचालकाला ताब्यात घेतले.

'व्हॅनचालकाची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, त्याने मद्यप्राशन केल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणी मोटार अधिनियम कायदा, तसेच अन्य कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे', असे विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नवनाथ जगताप यांनी सांगितले.

# साखर पन्नाशीपार

## ऐन सणासुदीच्या पार्श्वभूमीवर दरवाढीची झळ

**पुणे :** साखरेच्या उत्पादनात झालेली घट, तसेच वाढत्या मागणीमुळे गेल्या महिन्याभरात साखरेच्या दरात किलोमागे सहा ते सात रुपयांची वाढ झाली आहे. सणासुदीच्या तोंडावर साखर महाग होणार असल्याने सामान्यांना दरवाढीची झळ पोहोचणार आहे. किरकोळ बाजारात एक किलो साखरेला ५२ ते ५३ रुपये भाव मिळाला आहे. सणासुदीच्या काळात साखरेच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने ऑगस्ट महिन्याचा साखरेचा कोटा नुकताच जाहीर केला. साडेबावीस लाख टन एवढा कोटा ऑगस्ट महिन्यासाठी जाहीर करण्यात आला आहे. जुलै महिन्यात साखरेच्या दरात टप्प्याटप्प्याने वाढ होत गेली. साधारणपणे क्विंटलमागे ६०० रुपयांनी वाढ झाली. श्रावण मास, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, तसेच दिवाळीत साखरेच्या मागणीत वाढ होते. किरकोळ ग्राहकांसह मिठाई विक्रेत्यांकडून साखरेच्या मागणीत मोठी वाढ होते.

'गेल्या हंगामात साखर उत्पादनात घट झाली. घाऊक आणि किरकोळ बाजारातील मागणी विचारात घेता सध्या बाजारात होत असलेली साखरेची आवक अपुरी आहे. साखर कारखानदारांकडे साखरेचा साठा कमी आहे. व्यापारी साखरेची साठवणूक करू शकत नाहीत. तेवढी जागाही व्यापाऱ्यांकडे उपलब्ध नाही. मागणीच्या तुलनेत साखरेची आवक कमी असल्याने दरवाढ झाली आहे,' असे साखर व्यापारी, मोतीलाल अँड सन्स पेढीचे संचालक ईश्वर नहार यांनी नमूद केले.

मार्केट यार्डातील घाऊक बाजारात सोमवारी प्रतिक्विंटल साखरेला ४९०० ते ५१०० रुपये असा भाव मिळाला. घाऊक बाजारातील भाव तेजीत असल्याने किरकोळ बाजारातील दरवाढ अपरिहार्य आहे. किरकोळ बाजारात साखरेचा भाव ५२ ते ५३ रुपये किलो आहे, असे सांगण्यात आले.

> बाजारात सध्या चांगल्या प्रतीची साखर उपलब्ध नाही. चांगल्या प्रतीच्या साखरेचे भाव जास्त आहेत. साखर हंगाम सुरू होण्यासाठी तीन महिने लागणार आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस नवीन हंगाम सुरू होईल. त्यानंतर साखरेचा भाव कमी होईल. आगामी सणासुदीच्या काळात साखरेचे दर तेजीत राहणार आहेत.
> **– ईश्वर नहार,** साखर व्यापारी, मार्केट यार्ड भुसार बाजार

> पाऊस लांबल्याने ऊस लागवडीवर परिणाम झाला. ऊस लागवडीस वेळ लागणार असल्याने साखर कारखाने उशिरा सुरू होण्याची शक्यता आहे. केंद्र शासनाने उपलब्ध असलेला साखरेचा साठा विचारात घेणे गरजेचे आहे. सणासुदीच्या काळात मागणीच्या तुलनेत साखरेची आवक कमी होणार असून, भावही तेजीत राहणार आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात साखरेचे भाव कमी होण्याची शक्यता आहे.
> **– मुकेश गोयल,** साखर व्यापारी, मार्केट यार्ड, भुसार बाजार

**६००** रुपयांनी जुलै महिन्यात क्विंटलमागे साखरेच्या दरात वाढ झाली.

# महाराष्ट्र मेडिकल असोसिएशनचा आज बंद

## 'सीसीएमपी' पात्र डॉक्टरांच्या नोंदीचे आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** 'सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी' (सीसीएमपी) उत्तीर्ण झालेल्या 'बीएचएमएस' डॉक्टरांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमध्ये स्वतंत्र नोंदणी सुरू करण्याचे आदेश राज्य सरकारने सोमवारी जारी केले. या आदेशाचा निषेध करण्यासाठी 'इंडियन मेडिकल असोसिएशन'च्या महाराष्ट्र शाखेने आज, मंगळवारी (४ ऑगस्ट) सकाळी ६ वाजल्यापासून ते बुधवार (५ ऑगस्ट) सकाळी ६ वाजेपर्यंत राज्यभरात २४ तासांचा वैद्यकीय सेवा बंद ठेवण्याचा निर्धार केला आहे. या संदर्भात 'इंडियन मेडिकल असोसिएशन' पुणे विभागानेही रात्री उशिरा प्रसिद्धीपत्रक जारी केले असून, पुणे जिल्ह्यात वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे

शासनाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, 'एमएमसी'ने 'सीसीएमपी' पात्र डॉक्टरांची स्वतंत्र नोंदणी तातडीने सुरू करायची आहे. याबरोबरच या डॉक्टरांची कार्यकक्षा, वैद्यकीय निष्काळजीपणाशी संबंधित प्रकरणांमधील कार्यपद्धतीबरोबरच नैतिक नियमावली निश्चित करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यांची उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला एका महिन्याच्या आत आपला सविस्तर अहवाल सरकारला सादर करावा लागणार आहे.

'आयएमए महाराष्ट्र'चे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी यांनी सांगितले, की न्यायालयाचा अंतिम निकाल येईपर्यंत 'सीसीएमपी' डॉक्टरांची नोंदणी केली जाणार नाही, असे आश्वासन सरकारने आधी दिले होते. मात्र, आता अचानक आदेश काढल्यामुळे ॲलोपॅथीची गुणवत्ता, वैज्ञानिक आधार आणि रुग्णांच्या सुरक्षेवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेचे प्रशासक डॉ. बहुबली शहा यांनी शासन निर्णयाचे स्वागत केले आहे. त्याबरोबरच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने नोंदणी प्रक्रिया त्वरित सुरू करावी, अशी मागणी केली आहे. परिषदेचे प्रशासक डॉ. विंकी रुघवाणी यांनी यांनी नोंदणीसोबतच निष्काळजीपणाच्या तक्रारी हाताळणे आणि नैतिकतेवर अहवाल देण्यासाठी समिती स्थापन करण्याचे निर्देश मिळाले असून त्यानुसार पुढील कार्यवाही होईल. असे सांगितले

सरकारच्या या निर्णयाविरोधात आयएमए महाराष्ट्र, मार्ड, असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स आणि विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या संघटना यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



खडकवासला धरणातून पाणी सोडल्यामुळे मुठा नदी दुथडी भरून वाहत आहे. नदीपात्रातील रस्त्यावर वाहनेही अडकली आहेत. ती काढण्यासाठी नागरिकांची कसरत सुरू होती. (छाया : अरुल होरायझन)

# नदीपात्रात अडकलेल्या तरुणाला वाचविण्यात यश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** खडकवासला धरणातून मोठ्या प्रमाणावर सोडण्यात आल्यानंतर नदीपात्रात अडकलेल्या तरुणाची अग्निशमन दलाच्या जवानांनी सुटका केली.

डेक्कन जिमखाना परिसरात नदीपात्रात पुलाखाली पाण्यात एक तरुण अडकल्याची माहिती सोमवारी दुपारी चारच्या सुमारास अग्निशमन दलाच्या एरंडवणे केंद्राला मिळाली. या घटनेची माहिती मिळताच जवान महेश पांगारकर, सचिन आयवळे, आशुतोष पिंगळे, सागर मुंढे, कमलेश माने, राहुल वाघमोडे, नीलेश पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. खडकवासला धरण साखळीत झालेल्या पावसामुळे सोमवारी दुपारनंतर मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आले. त्यामुळे पाण्याच्या प्रवाहात अडकलेल्या तरुणाला बाहेर पडता येत नव्हते. जवानांनी दोरी, लाईफ जॅकेटचा वापर करून तरुणाला पाण्यातून बाहेर काढले. तरुण कर्वेनगर भागातील आहे. तरुणाला पाण्यातून बाहेर काढण्यात आल्याने जमलेल्या नागरिकांनी अग्निशमन दलाच्या जवानांचे कौतुक केले.

# अभिनेता ऋषीकेश कानडे यांचे निधन

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** अभिनेता ऋषीकेश कानडे (वय ३८) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी पहाटे निधन झाले. त्यांच्यामागे आई, वडील, पत्नी आणि बहीण असा परिवार आहे. कानडे यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. 'मी भारतीय' नाटकातील भूमिकेमुळे ऋषीकेश यांना अभिनेता म्हणून ओळख मिळाली. राज्य नाट्य स्पर्धेत सलग दोन वर्षे त्यांना अभिनयासाठी रौप्यपदकाने गौरविण्यात आले. अभिनयाव्यतिरिक्त ते स्वतःचा ऑनलाइन फिटनेस क्लबदेखील चालवायचे.

# फेरमोजणीतून नागरिकांची मुक्तता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** जमिनीची मोजणी करताना अक्षांश, रेखांशाची माहिती असणारी 'क प्रत' देण्यात सुरुवात झाल्यामुळे सन २०२४ नंतर जमिनीची मोजणी ही अंतिम ग्राह्य धरली जाणार आहे. त्या संदर्भातील परिपत्रक भूमी अभिलेख विभागाकडून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये जारी केले जाणार असून, त्यामुळे नागरिकांची फेरमोजणीतून मुक्तता होणार आहे.

बांधकाम परवानगी अथवा अन्य कामांसाठी मोजणीच्या क प्रतीची आवश्यकता असते. जमिनीची काही वर्षापूर्वी मोजणी केल्यास ती मोजणी ग्राह्य धरली जात नव्हती. पुन्हा मोजणी करावी लागत होती. मोजणीची तारीख मिळणे आणि प्रत्यक्षात मोजणी होऊन 'क प्रत' मिळण्यात काही महिन्यांचा कालावधी लागत होता. या वेळखाऊ प्रक्रियेमुळे संबंधित व्यक्तीच्या कामावर परिणाम होऊन त्याला विलंब होत होता. तसेच महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायतींकडून फेरमोजणीची मागणी केल्याने मोजणीच्या संख्येचा भूमी अभिलेख विभागावर ताण वाढत होता.

चार वर्षांपूर्वीपर्यंत मोजणीनंतर मिळणाऱ्या क प्रतीवर जमिनींचे अक्षांश, रेखांशाची नोंद करण्यात येत नव्हती. त्यामुळे जमिनीचे, मालमत्तेचे अचूक स्थान, चतुःसिमा निश्चित करताना अडचणीचे ठरत होते. दरम्यान, भूमी अभिलेख विभागाने सुरू केलेल्या मोजणीच्या 'ई मोजणी व्हर्जन -२' मध्ये अक्षांश, रेखांश नोंदी करण्यास सुरुवात केली आहे. संबंधित जागेची हद्द, स्थान हे अक्षांश, रेखांशाद्वारे स्पष्ट होत असून, ठराविक कालावधीनंतर पुन्हा मोजणी करण्याची नागरिकांना आवश्यकता नाही, याकडे भूमी अभिलेख विभागाने लक्ष वेधले आहे.

२०२४ पासूनच्या मोजणीच्या 'क प्रत'वर अक्षांश, रेखांशची नोंद असल्याने तीच मोजणी ग्राह्य धरण्यात येणार आहे. अक्षांश, रेखांशाच्या नोंदी असल्या तरी त्या जमिनीबाबत हद्द किंवा मोजणीबाबत न्यायालयात किंवा खासगीमध्ये वाद असल्यास त्याबाबत स्वतंत्रपणे मोजणीचा पर्याय स्वीकारावा लागणार आहे.

# सहा महिन्यांपर्यंतच्या स्तनपानाच्या प्रमाणात घट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

### प्रमाण ५५.८ टक्क्यांवर; 'एनएफएचएस-६'च्या अहवालातून जागतिक स्तनपान सप्ताहात चिंताजनक चित्र

**पुणे :** बाळाच्या जन्मानंतर पहिल्या सहा महिन्यांपर्यंत बाळाला केवळ आईचे दूध देण्याचे प्रमाण देशात लक्षणीयरीत्या घटल्याचे वास्तव समोर आले आहे. जनजागृतीचा अभाव, करिअरच्या वाढत्या जबाबदाऱ्या आणि उशिरा राहणारी गर्भधारणा यामुळे अशा बालकांचे प्रमाण ६३.७ टक्क्यांवरून ५५.८ टक्क्यांवर घसरले आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या (एनएफएचएस-६) ताज्या आकडेवारीतून हे स्पष्ट झाले आहे.

स्तनपानाचे माता आणि बालकाच्या आरोग्यासाठी असलेले अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि स्तनपानाबाबत जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने दर वर्षी १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत जागतिक स्तनपान सप्ताह साजरा केला जातो. लोकसंख्या, माता-बाल आरोग्य, पोषण आणि कुटुंब कल्याणाशी संबंधित विविध निर्देशकांचे मूल्यांकन करणारे केंद्र सरकारचे राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण हे देशातील सर्वांत महत्त्वाचे सर्वेक्षण मानले जाते.

या सर्वेक्षणाच्या २०१९ ते २०२१ या कालावधीतील अहवालानुसार, जन्मानंतरच्या पहिल्या सहा महिन्यांत केवळ आईचे दूध मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण ६३.७ टक्के होते. मात्र, नुकत्याच जाहीर झालेल्या एनएफएचएस-६ च्या आकडेवारीत हे प्रमाण आठ टक्क्यांनी घसरून ५५.८ टक्क्यांवर आले आहे. या घसरणीमुळे सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

तज्ज्ञांच्या मते, स्तनपानाची प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी केवळ आईची इच्छाशक्ती पुरेशी नसून, कुटुंब, आरोग्य यंत्रणा आणि तज्ज्ञांचे सातत्यपूर्ण सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. प्रसूतीनंतर अनेक महिलांना बाळाला योग्य प्रकारे स्तनपान कसे द्यावे, दूध कमी येणे, स्तनात वेदना किंवा सूज यांसारख्या अडचणींचा सामना करावा लागतो. या समस्या वेळेत सोडवल्या गेल्या नाहीत, तर आईचा आत्मविश्वास कमी होऊन स्तनपान लवकर बंद होण्याची शक्यता वाढते. याचा विपरीत परिणाम आईच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होऊ शकतो. स्तनपानाला केवळ आईची जबाबदारी म्हणून पाहणे चुकीचे ठरते. नवमातेला घरातील सदस्यांचा भावनिक आधार, प्रसूतीनंतर योग्य वैद्यकीय मार्गदर्शन आणि कार्यस्थळी अनुकूल वातावरण मिळाल्यास स्तनपानाचा कालावधी वाढण्यास मोठी मदत होते.

> गेल्या काही काळात प्रसुती या जोखमीच्या आणि गुंतागुंतीच्या बनत आहे. त्यामुळे स्तनपानचा कालावधी कमी होत चालला आहे. तसेच, आता मुलींमध्ये रक्तदाब, स्थूलता यांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर आढळत आहे. करिअरमुळे आई बाळाला स्तनपान करण्यास फारशी उत्सुक नसल्याचेही पाहायला मिळते. कुटुंबपद्धती बदलत चालली आहे. तसेच, गर्भधारणेच्यावेळी स्त्रियांमध्ये अशक्तपणा, जीवनसत्वांची मोठी कमतरता असते. त्यामुळेही स्तनपानाचा कालावधी कमी होत आहे.
> **– डॉ. शिल्पा नाईक,** प्राध्यापिका, स्त्री रोगतज्ज्ञ विभाग, बी.जे महाविद्यालय



### स्तनपानाचे महत्त्व

- **पहिल्या सहा महिन्यांसाठी बाळासाठी संपूर्ण आणि सर्वोत्तम अन्न**
- संसर्गजन्य आजारांचा धोका कमी होतो
- **लठ्ठपणा, मधुमेह, दीर्घकालीन आजाराची शक्यता कमी**
- मेंदूची वाढ व विकासाला चालना
- **आई-बाळातील भावनिक नाते अधिक दृढ होण्यास मदत**
- गर्भधारणेमुळे आईमध्ये येणारी स्थूलता कमी होण्यास मदत
- **स्तन व अंडाशयाच्या कर्करोगाची शक्यता कमी**


# बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961

**नोंदणीकृत कार्यालयः** आकुर्डी, पुणे -४११०३५ । **कॉर्पोरेट कार्यालयः** ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११०१४

## मुदत ठेव योजना

CRISIL AAA/स्टेबल आणि (ICRA)AAA (स्टेबल) रेटिंग

या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

**₹३ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (१ मे २०२६ पासून लागू) वैध आहे.**

**नियमित ठेवीदार**

**नियमित एफडी: ₹१५,००० ते ₹३,००,००,०००**

तक्ता १

| कालावधी | संचयी | बिगर- संचयी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मुदत पुर्तीला (% प्र.व.) | मासिक (% प्र.व.) | त्रैमासिक (% प्र.व.) | सहामाही (% प्र.व.) | वार्षिक (% प्र.व.) |
| १२ - १७ महिने | ६.६० | ६.४१ | ६.४४ | ६.४९ | ६.६० |
| १८ - ३० महिने | ६.८५ | ६.६४ | ६.६८ | ६.७४ | ६.८५ |
| ३१ - ६० महिने | ७.४० | ७.१६ | ७.२० | ७.२७ | ७.४० |

क) ठेवीचा किमान आकार हा ₹१५,०००/- राहिल.

ख) वैयक्तिक ठेविदार किंवा प्राथमिक ठेविदार, ज्येष्ठ नागरिकांच्या विशेष श्रेणीत (म्हणजे ६० वर्षांहून अधिक वयाच्या व्यक्ति, वयाच्या पुराव्याच्या तरतूदीच्या अधीन) वार्षिक ०.३५% पर्यंतच्या दराने अतिरिक्त व्याजासाठी प्रती ₹३ (तीन) कोटी पर्यंतच्या रक्कमेकरिता पात्र असतील.

ग) ₹३ कोटींहून जास्त रकमेच्या प्रत्येक घाऊक ठेवीसाठी प्रकाशित झालेल्या कार्ड दराहून व्याज दर भिन्न असू शकतो आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने विनिर्दिष्ट केलेल्या व्याज दराच्या मर्यादेमध्ये प्रत्येक प्रकरणानुसार ठरवला जाईल.

घ) बजाज फायनान्स लि. कडून अर्जाला एकदा मंजुरी मिळाली तर व्याज त्या दिवसापासून चालू होईल ज्या दिवसापासून (i) गुंतवणुकदाराने बजाज फायनान्स च्या अधिकृत पोर्टल किंवा आमच्याशी संलग्न भागीदाराच्या पोर्टल वरुन गुंतवणुकीचा अर्ज केला आहे, जेथे बजाज फायनान्स चे पेमेंट गेट्वे वापरले आहे (ii) बजाज फायनान्स ला रक्कम मिळेल जर गुंतवणुकदाराने आमच्याशी संलग्न भागीदाराच्या पोर्टल वरुन गुंतवणुकीचा अर्ज केला आहे, जेथ संलग्न भागीदाराचे पेमेंट गेट्वे वापरले आहे (iii) बजाज फायनान्स ला रक्कम मिळेल जर गुंतवणुकदाराने चेकिंवा कुठल्याही दुसऱ्या पद्धतीने गुंतवणुक केली आहे.

ड) परिपक्वतेच्या तारखेपूर्वी विहित कालावधीमध्ये नूतनीकरणाची विनंती प्राप्त न झाल्यास परिपक्वतेच्या तारखेला कंपनी ठेवीची रक्कम परत करेल. ठेवीच्या अर्जामध्ये ठेवीदाराने नमूद केलेल्या बँक खात्यामध्ये एनईएफटी किंवा आरटीजीएस किंवा धनादेशाने (एनईएफटी/आरटीजीएस नाकारले गेल्यास) प्रदान केले जाईल.

च) ठेवीचे (किंवा त्यातील काही भागाचे) नूतनीकरण करण्याची विनंती ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेपूर्वी कामकाजाच्या निदान २४ तास आधी, कंपनीच्या जवळच्या शाखेला भेट देऊन किंवा टपाल, स्वतंत्र आर्थिक सल्लागार किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे लेखी विनंती पाठवून केली जाऊ शकते, ज्यायोगे कंपनीला देय तारखेला प्रकरणानुसार ठेवीची (किंवा त्यातील काही भागाची) परतफेड आणि/किंवा नूतनीकरण करता येईल. वर नमूद केलेल्या कालावधीनंतर ठेवीच्या नूतनीकरणाच्या कोणत्याही विनंत्या स्वीकारल्या जाणार नाहीत. नूतनीकरणाच्या विनंतीसह सर्व ठेवीदारांनी योग्य प्रकारे भरलेला आणि स्वाक्षरी केलेला ठेवीच्या अर्जाचा फॉर्म असणे आवश्यक आहे. ठेवीचे नूतनीकरण हे नूतनीकरणाच्या तारखेला असलेल्या व्याज दर आणि इतर अटी आणि शर्तींनुसार होईल. ठेवींच्या नूतनीकरणाच्या वेळी विद्यमान ठेवीचा एफडीआर आवश्यक नसेल कारण परिपक्वतेच्या तारखेनंतर तो रद्दबातल होईल.

छ) जर ग्राहकाने अर्जाद्वारे नूतनीकरणाचा पर्याय निवडला असेल परंतु त्यानंतर त्याला नूतनीकरण करायचे नसेल तर त्यासंबंधीचा लिखित अर्ज कंपनीकडे नूतनीकरण तारखेच्या कमीत कमी २४ तास आधी पोहोचला पाहिजे. हा अर्ज सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे देता येईल. मुदत पूर्तीच्या दिवसानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दुरुस्ती झालेल्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज अँड मिस्लेनिअस नॉन-बँकिंग कंपनीज (जाहिरात) नियम, १९७७ नुसार द्यावयाचा तपशील.

**क. कंपनीचे नाव: बजाज फायनान्स लि.**

**ख. गठित केले गेल्याचा दिनांक: 25 मार्च, 1987**

**ग. प्रॉफिट्स्/डिव्हिडंड्स्:**

वरील वर्षांच्या संबंधात, जाहिरातीची तारीख आणि कंपनीद्वारे घोषित लाभांशाच्या तत्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांसाठी, कराची तरतुद करण्याआधी व नंतर कंपनीचा नफा.

(₹ कोटींमध्ये)

| आर्थिक वर्ष रोजी संपले | नफा (स्टँडअलोन) कर-पूर्व | कर-पश्चात | लाभांश % |
|---|---|---|---|
| ३१.०३.२०२४ | १७,०५३.०८ | १२,६४४.११ | १८०० |
| ३१.०३.२०२५ | २१,६७६.०९ | १६,६६१.५० | २२०० |
| ३१.०३.२०२६ | २३,६७१.९० | १७,८०३.८७ | ६०० |

**घ ड. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात तपशील:**

संचालक मंडळाचे नियंत्रण व देखरेख यांच्या अधीन राहून व्यवस्थापकीय संचालक कंपनीचे व्यवस्थापन पाहतात. कंपनीचा व्यापार-उदीम आणि इतर बाबी यांच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकीय संचालकाना आवश्यक ते अधिकार प्रदान केलेले आहेत.

**च. संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसाय:**

| नाव | पत्ता | व्यवसाय |
|---|---|---|
| श्री. संजीव बजाज (अध्यक्ष) | प्लॉट क्र.५९, लेन क्र.३ कोरेगांव पार्क, पुणे सिटी - ४११००१. | उद्योगपती |
| श्री. राजीव जैन, (उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक) | डी-२, आयव्ही ग्लेन, मॅरीगोल्ड प्रिमायसेस, कल्याणी नगर, पुणे - ४११०१४. | नोकरी |
| श्री. राजीव बजाज | ३४/३५, लेन क्र. २ कोरेगाव पार्क, पुणे, महाराष्ट्र, भारत - ४११०३५. | उद्योगपती |
| डॉ नौशाद फोर्ब्स | ७४ कोरेगाव पार्क, लेन क्र.३, पुणे - ४११ ००१. | व्यवसाय |
| श्री अनामी रॉय | ६२ सागर तरंग, खान अब्दुल गफार खान रोड, वरळी सी फेस, वरळी, मुंबई ४०० ०३०. | सेवानिवृत्त सनदी सेवक |
| श्री प्रमीत झवेरी | २१ सी, वूडलँड्स, पेड्डर रोड, कंबाला हिल, मुंबई - ४०० ०२६. | व्यवसाय |
| श्रीमती राधिका हरिभक्ती | ५१, मेकर टॉवर बी, कफ परेड, मुंबई - ४०० ००५. | आर्थिक सल्लागार / व्यावसायिक संचालक |
| डॉ. अरिंदम भट्टाचार्य | एल१/४, २रा मजला, हौस खाझ, नवी दिल्ली - ११० ०१६. | व्यावसायिक |
| श्री. तरुण बजाज | बंगला क्र.३८, नवीन मोती बाग, नवी दिल्ली - ११० ०२१. | स्वतंत्र सल्लागार |
| श्री. अजय कुमार चौधरी | फ्लॅट क्र.१३०४, १३वा मजला, क्रेसेंट बे टॉवर क्र.६, जेरबाई वाडीया रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२. | व्यावसायिक |

**च. सर्वात अलिकडच्या दोन लेखा-परिक्षित बॅलन्स-शीटमध्ये दिसणारा कंपनीचा (स्टँडअलोन) आर्थिक स्थिती सारांश**

(₹ कोटींमध्ये)

| | ३१ मार्च २०२६ रोजी | ३१ मार्च २०२५ रोजी |
|---|---|---|
| **मालमत्ता** | | |
| **आर्थिक मालमत्ता** | | |
| रोख व रोख समकक्ष | १,६३३.८८ | ३,३७४.४१ |
| रोख आणि रोख समकक्षांव्यतिरिक्त बँक बॅलन्स | ११,४७१.९४ | ९,०८०.९८ |
| व्युत्पन्न आर्थिक साधने(डेरीवेटीव्ह फायनान्शियल इंस्ट्रुमेंट्स) | २,३८५.१६ | २०१.९७ |
| व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स) | १,५७५.७६ | १,४१६.३९ |
| कर्जे | ३,६७,२२५.९६ | ३,०४,३५९.१६ |
| गुंतवणूकी | ३८,०७४.३७ | ४१,७१६.२३ |
| इतर आर्थिक मालमत्ता | ४,१७२.७३ | २,४२६.९२ |
| **एकूण आर्थिक मालमत्ता** | **४,२६,५३९.८०** | **३,६२,५७६.०६** |
| **बिगर-आर्थिक मालमत्ता** | | |
| सध्याची कर मालमत्ता (निव्वळ) | २०२.०८ | ४०४.५७ |
| स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | १,४३०.४४ | १,०४४.१४ |
| प्रॉपर्टी, प्लान्ट आणि इक्विपमेंट | २,६८०.६१ | २,५३१.५१ |
| भांडवल काम प्रगतीपथावर | ६१.८३ | २६.७४ |
| विकासा अंतर्गत अमूर्त मालमत्ता | ५७.४३ | १२.४६ |
| अमूर्त मालमत्ता | १,०४३.६९ | १,०४३.१४ |
| इतर बिगर-आर्थिक मालमत्ता | १८७.४३ | २३०.९४ |
| **एकूण बिगर-आर्थिक मालमत्ता** | **५,६६३.५१** | **५,२९३.५०** |
| **एकूण मालमत्ता** | **४,३२,२०३.३१** | **३,६७,८६९.५६** |
| **देणी व इक्विटी** | | |
| **देणी** | | |
| **आर्थिक देणी** | | |
| व्युत्पन्न आर्थिक साधने देय | - | २५.५३ |
| व्यापार देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | ०.९१ | १.२७ |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | १,२८०.५० | १,११९.८४ |
| इतर देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | ०.३३ | ०.४२ |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | ९९४.९५ | ८०६.१९ |
| कर्जाच्या सिक्युरिटीज | १,३३,५२७.०८ | १,११,०१०.८८ |
| उधारी (कर्ज रोखे वगळता) | १,१८,०००.४५ | ८९,७३७.६६ |
| ठेवी | ६८,४८५.५५ | ७१,३६५.५२ |
| उप-कर्जे | ३,८०५.३१ | ३,१०३.५४ |
| इतर आर्थिक देणी | २,४९६.५० | १,६९०.६४ |
| **एकूण आर्थिक देणी** | **३,२७,५९१.५८** | **२,७८,८६१.४९** |
| **बिगर-आर्थिक देणी** | | |
| सध्याचे कराचे देणे (निव्वळ) | १७५.५४ | ५४.९७ |
| तरतुदी | ६७३.२६ | ४६४.२७ |
| इतर बिगर-आर्थिक देणी | ६४०.५९ | ४९३.१२ |
| **एकूण बिगर-आर्थिक देणी** | **१,४८९.३९** | **१,०१२.३६** |
| **इक्विटी** | | |
| इक्विटी शेअर भांडवल | ६२१.७९ | १२४.१७ |
| इतर इक्विटी | १,०२,५००.५५ | ८७,८७१.५४ |
| **एकूण इक्विटी** | **१,०३,१२२.३४** | **८७,९९५.७१** |
| **एकूण देणी व इक्विटी** | **४,३२,२०३.३१** | **३,६७,८६९.५६** |

**आकस्मिक देणी (स्टँडअलोन)**

| तपशील | ३१ मार्च २०२६ रोजी | ३१ मार्च २०२५ रोजी |
|---|---|---|
| कर्ज म्हणून गणले जात नाहीत असे कंपनीविरुद्धचे विवादाचे दावे | १५३.९० | १४१.२० |
| अपील अंतर्गत पीएफ बाबी | ११०.७६ | ११०.७६ |
| अपील अंतर्गत वॅट बाबी | ४.३१ | ४.३१ |
| अपील अंतर्गत ईएसआय बाबी | ५.१४ | ५.१४ |
| बँक हमी | ०.५० | ०.५० |
| अपील अंतर्गत जीएसटी / सेवा कर बाबी | | |
| - व्याज सबसिडीवर | २,५५२.२० | २,४२२.९२ |
| - गुंतवणुकीच्या क्रियाकलापावरील क्रेडिटच्या अतिरीक्त प्रवर्तनावर | ६५८.५७ | ६३०.३२ |
| - आगाऊ वसूल केलेल्या व्याजावर | ९३६.२२ | ८७४.७९ |
| - दंडव्याज/ चार्जेस यांवर | - | - |
| - ग्राहकाने क्रेडिट नोटवर इनपुट टॅक्स क्रेडिट परत केल्यावर | २२.९९ | १४.१३ |
| - जास्तीच्या दाव्यावर आयटीसी आणि जीएसटीआर-१ विरुद्ध जीएसटीआर ३बी मधील फरक | ३२.४२ | ३३.२९ |
| - इतरांबाबत | ४.७७ | १५.४८ |
| प्राप्तीकराच्या बाबीः | | |
| - कंपनीद्वारे केली गेलेली अपिल्स | १५९.२७ | ७२.६१ |
| - प्राप्तीकर विभागाने केलेली अपिल्स | - | - |

**छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिटस् (रिझर्व बँक) डायरेक्शन्स, २०२५ यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे : १,४३,६२६.९१ कोटी**

**ख) प्रत्यक्षात ३१.०३.२०२६ रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम खालीलप्रमाणे आहे :**

**(I) सार्वजनिक ठेवी : ३९,३७९.७३ कोटी**

**(ii) सार्वजनिक ठेवींव्यतिरिक्त : २९,१०५.८२ कोटी**

**ज.** ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वारस्य अशा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार-उदीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर-निधी स्वरुपाची एकूण येणी (ड्यूज) ही १४६.४२ कोटी इतकी आहेत (बजाज हौसिंग फिनान्स लि. - ०.८९ कोटी, बजाज लाईफ इन्शुरन्स कंपनी लि. - ६९.७६ कोटी, बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लि. - १२.८६ कोटी, बजाज फिन्सर्व हेल्थ लि. - ३०.६८ कोटी, बजाज ऑटो लि. - २५.३६ कोटी, बजाज इलेक्ट्रीकल्स लि. - ०.८० कोटी, बजाज फिनान्शियल सेक्युरिटीज लि. - ०.१० कोटी, बजाज फिनसर्व्ह डायरेक्ट लि. - ०.३९ कोटी, बजाज ऑटो टेक्नॉलॉजी लि. - २.२९ कोटी, बजाज ऑटो क्रेडिट लि. - ०.९३ कोटी, पेनंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. - १.०६ कोटी, बजाज फिनसर्व्ह लि. - १.३० कोटी).

**झ.** ज्याबाबत दावा केला गेला नाही त्याशिवाय इतर कोणत्याही देण्याची वेळ टळून गेलेल्या (ओव्हरड्यू) ठेवी कंपनीकडे नाहीत.

**ञ.** कंपनी खालीलप्रमाणे घोषित करीत आहेः

I) आपल्याला लागू असलेल्या निर्देशांच्या तरतुदींचे पालन कंपनीने केलेले आहे.

ii) निर्देशांची पूर्तता होण्यामुळे, रिझर्व बँक ऑफ इंडियाने ठेवी परत देण्याची (रिपेमेंट) हमी घेतली आहे असे सूचित होत नाही

iii) कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी ह्या सुरक्षित नाहीत (अनसिक्युअर्ड आहेत) आणि इतर अनसिक्युअर्ड देण्यांच्याच श्रेणीत त्या गणल्या जातात.

iv) कंपनीने विनंती केली आहे त्या ठेवींचा विमा उतरवलेला नाही.

v) अर्जाच्या प्रपत्रात प्रकट केली आहे ती कंपनीची आर्थिक स्थिती व त्यातील निवेदने ही खरी आणि अचूक आहेत. त्यातील अचूकता आणि सत्यता यासाठी कंपनी आणि तिचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. कंपनीची आर्थिक कृती-कार्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाद्वारे नियंत्रित केली जातात. तथापि, हे स्वच्छपणे समजून घेतलेच पाहिजे की कंपनीच्या आर्थिक भक्कमतेसाठी किंवा कोणत्याही निवेदनांच्या अचूकतेसाठी किंवा कंपनीद्वारे मांडल्या गेलेल्या भूमिका किंवा व्यक्त केलेली मते आणि ठेवी परत देण्याची / देणी चुकवण्याची कंपनीची स्थिती याबाबतची कोणतीही जबाबदारी रिजर्व बँक ऑफ इंडिया घेत नाही.

**ट.** ठेवी ह्या, अर्जाच्या प्रपत्रात दिलेल्या अटी व शर्तींच्याही अधीन राहतील.

**ठ.** रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या त्या संदर्भातील नियमनांच्या अधीन राहून मुदतीच्या अंतिम दिनांकापूर्वी ठेवी काढून घेता येऊ शकतील. कृपया नोंद घ्या की मुदतीआधी ठेव काढून घेणे (मृत्यूच्या केसेसचा समावेश) हे खालील अटींच्या अधीन राहिल

क) ठेवीच्या तारखेपासून ३ (तीन) महिन्यांपर्यंत: ठेव काढण्याची परवानगी नाही. तथापि:

i) ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास, कंपनी हयात असलेल्या ठेवीदाराला मुदतपूर्वीच ठेवीची परतफेड करू शकते (प्रतीक्षा कालावधीचा विचार न करता) (जो संयुक्त धारकांच्या बाबतीत अर्जातील अर्जदारांच्या अनुक्रमात प्रथम असेल त्याप्रमाणे) किंवा प्रकरणाप्रमाणे मृत ठेवीदाराच्या नामनिर्देशित/कायदेशीर वारसांना, हयात ठेवीदार/नामनिर्देशित/कायदेशीर वारसाच्या विनंतीनुसार करू शकते मात्र त्यासाठी कंपनीची खातरजमा होण्यासाठी मृत्यूचा पुरावा आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

ii) जर ठेवीदाराला, आणीबाणीच्या प्रसंगीचा वैद्यकीय खर्च किंवा नैसर्गिक आपत्तींमुळे किंवा संकटांमुळे करावा लागणारा खर्च यांसारख्या तातडीच्या खर्चासाठी त्याची ठेव मुदतपूर्तीपूर्वी काढायची असेल, तर अशी ठेव काही अंशी म्हणजे मुद्दल रकमेच्या ५०% पर्यंत किंवा ५ लाख रुपये यांपैकी जी कमी असेल तेवढी रक्कम मुदतपूर्तीपूर्वी काढण्याची परवानगी आहे. बीएफएलच्या धोरणानुसार अशा प्रकारच्या तातडीच्या खर्चांची पडताळणी/मुल्यांकन केले जेऊ शकते.

iii) अत्यंत गंभीर अवस्थेतील आजारासाठी ठेवीदाराला मुद्दल रकमेच्या १००% पर्यंत रक्कम व्याजाशिवाय देण्यात येईल. या पोटकलमासाठी 'गंभीर आजार' या शब्दाची व्याख्या ही वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आयआरडीएआय (हेल्थ इन्शुरन्स) रूल्स, २०१६ मध्ये दिल्यानुसार व त्याअंतर्गत जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार असेल.

iv) ठेवीदाराने विनंती केल्यास एकूण १०,००० रुपयांपेक्षा जास्त मुद्दल रक्कम नसलेल्या ठेवी (''टायनी डिपॉझिट'') ठेवीदाराला किंवा सर्व ठवींच्या बाबतीत त्याच भूमिकेत प्रथम नाव असलेल्या ठेवीदाराला मुदतपूर्तीपूर्वी व्याजाशिवाय प्रदान केल्या जातील.

ख) ठेवीच्या तारखेपासून ३ (तीन) महिन्यानंतर परंतु ६ (सहा) महिन्यांपूर्वी. ठेव काढण्याची परवानगी दिली जाईल. तथापि, व्याज देय असणार नाही.

ग) ६ (सहा) महिन्यांनंतर परंतु ठेवीच्या परिपक्वता तारखेपूर्वी: ठेव काढण्याची परवानगी दिली जाईल. ज्या कालावधीसाठी ठेव योजना चालू केली आहे त्या कालावधीसाठी निर्दिष्ट केलेल्या दरापेक्षा २% कमी दराने व्याज देय असेल. जर ठेव कालावधीसाठी कोणताही दर निर्दिष्ट केलेला नसल्यास, देय व्याजदर हा कंपनीने देऊ केलेल्या सर्वात कमी दरापेक्षा ३% कमी असेल.

**ड.** असल्यास, शाखांच्या किंवा एककांच्या तपशीलासह कंपनी व तिच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः

१. कंपनी व तिच्या शाखा चालवत असलेला व्यापार-उदीमः

ग्राहकांना अर्थ-पुरवठा करण्याच्या श्रेणीमध्ये यांचा समावेश - वाहन-कर्ज, दीर्घ काल वापरण्याच्या वस्तूंसाठी ग्राहकांना कर्ज, वैयक्तिक कर, मालमत्ता तारण कर्ज, गृह कर्ज, बांधकाम साहित्य खरेदीसाठी कर्ज, लहान व्यवसायासाठी कर्ज, सिक्युरीटीजच्या तारणावर कर्ज आणि पायाभूत सोयी-सवलतींसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) कर्ज. कंपनीच्या शाखा येथे आहेत: आग्रा, अहमदाबाद, अहमदनगर, अजमेर, अकोला, अकोट, अलापुझ्झा, अलाहाबाद, अंबाला, अमरावती, अमरेली, अमृतसर, आणंद, अनंतपूर, आणि अंकलेश्वर, असनसोल, औरंगाबाद, बागलकोट, बंगलोर, बारामती, बार्डोली, बरेली, बडोदा, बार्शी, बेळगाव, बेल्लारी, भंडारा, भडोच, भटिंडा, भावनगर, भिलाई, भिवंडी, भोपाल, भुवनेश्वर, भूज, बिदर, विजापूर, बिकानेर, बिलासपूर, बोकारो, बोलपूर, बोरसाड, कालिकत, चाळीसगाव, चंदिगड, चंद्रपूर, चेन्नई, छिंदवाडा, चिखली, चिपळूण, चित्रदुर्ग, चित्तरंजन, चोपडा, कोचीन, कोईम्बतूर, कडलोर, कटक, दाभोई, दाहोद, दावणगेरे, डेहराडून, देवास, धनबाद, धारापुरम, धारवाड, धुळे, दिंडीगुल, दुर्गापूर, एलुरू, इरोड, गांधीधाम, गोवा, गोकाक, गुलबर्गा, गुना, गुंटूर, ग्वाल्हेर, हलदिया, हलोल, हासन, हावेरी, हिंम्मतनगर होशंगाबाद, होशियारपूर, हॉस्पेट, हुबळी, हैदराबाद, इंदूर, जबलपूर, जगधरी, जयपूर, जालंधर, जळगाव, जलपैगुडी, जम्मू, जामनगर, जामनेर, जमशेदपूर, जोदपूर, जुनागढ, कडी, कैथाल, काकीनाडा, कालका, कन्नूर, कानपूर, कपूरथळा, क-हाड, कराईकुडी, कर्नाल, करुनागापल्ली, करूर, कारवार, कटनी, खामगाव, खांडवा, खडगपूर, कोलार, कोल्हापूर, कोलकाता, कोल्लम, कोपरगाव, कोरबा, कोटा, कोट्टायम, कर्नूल, कुरुक्षेत्र, लातूर, लखनौ, लुधियाना, मच्छलीपट्टम, मदुराई, मंड्या, मंगलोर, म्हापसा, मडगाव, मेहसाणा, मोगा, मोर्वी, मुंबई, म्हैसूर, नभा, नडियाद, नागरकॉईल, नागपूर, नमक्कल, नांदेड, नंदुरबार, नाशिक, नवसारी, नेल्लोर, नवी दिल्ली, पालनपूर, पंढरपूर, पानिपत, पतियाळा, पाटणा, पेण, फगवाडा, पिंपळगाव, पोलाची, पॉंडिचेरी, पुणे, पुत्तूर, रायचूर, रायपूर, राजामुंद्री, राजगुरूनगर, राजकोट, राजनांदगाव, राजपुरा, राणाघाट, रांची, रतलाम, रत्नागिरी, रेवा, रोहतक, रोपार, राऊरकेला, सालेम, सांगली, सातारा, सतना, सिहोर, सिमला, शिमोगा, सिलीगुडी, सिरसा, सोलापूर, सुरत, सुरेंद्रनगर, तेनाली, थिरुवल्ला, थिरुनेलवेल्ली, तिरुपती, थिरूपूर, त्रिचूर, त्रिची, त्रिवेंद्रम, तुमाकुरू, तुतीकोरीन, उदयपर, उडिपी, उज्जैन, वडाकारा, बलसाड, वापी, वाराणसी, विदिशा, विजयवाडा, विझाग, विजयानगरम, वणी, वारंगल, वर्धा, वरूड, वाशिम, यवतमाळ आणि www.bajajfinserv.in=> Contact us=>Visit our branch या अधिकृत संकेतस्थळ पानावर नमूद केलेल्या इतर सर्व शाखा किंवा https://www.bajajfinserv.in/branch-locator यावर थेट क्लिक करा.

२. कंपनीच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः

| अ. क्र. | उपकंपनीचे नाव | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कृती-कार्य |
|---|---|---|---|
| 1. | बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | हाउसिंग फायनान्स व्यापार-उदीम |
| 2. | बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | स्टॉक ब्रोकिंग आणि डिपॉझिटरी सहभागी |

**जाहिरातीचा वरील मजकूर हा संचालक मंडळाच्या अधिकाराने व त्यांच्या नावाने जारी केला गेलेला आहे आणि संचालक मंडळाने ३० जुलै २०२६ च्या आपल्या बैठकीत या मजकुराला मान्यता दिलेली आहे आणि मंडळाने अधिकार दिलेले श्री. राजीव जैन, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांनी सही केलेली त्याची एक प्रत नोंदणीसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे पोहचवली गेलेली आहे.**

पुणे
३१ जुलै २०२६

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
संचालक मंडळाच्या आदेशान्वये

श्री. राजीव जैन
उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
DIN: ०१५५०१५८

बजाज फायनान्स ॲप डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करा.

**गुंतवणूक कशी करावी:**

गुंतवणूक केवळ धनादेश द्वारे, नेटबँकिंग द्वारे होऊ शकते. धनादेश द्वारे गुंतवणूक करत असल्यास Bajaj Finance Ltd. A/c 00070350006738 ह्या नावाने करावी. त्यावर 'अकाऊंट पेयी ओन्ली' असे लिहून तो क्रॉस करावा. धनादेश 'at par' देय असावा व CTS पूर्ततेचा असावा. गुंतवणूक रकमेसह अर्ज प्रपत्र ह बजाज फिनान्स च्या मुदत ठेव वितरकांकडे किंवा बजाज फिनान्स च्या कोणत्याही शाखांकडे द्यावे. नेटबँकिंग द्वारे गुंतवणूक करायची असल्यास ह्या तपशीलाचा वापर करावा: लाभार्थी नावः बजाज फिनान्स लि. मुदत ठेव संकलन खाते, बँक खाते क्र.: BFLFD8 (संख्यात्मक खाते क्र. ECMS संकलन कोड BFLFD8 ने बदलला आहे), बँक खाते प्रकार: करंट खाते, बँकेचे नाव: एचडीएफसी बँक लि., आयएफएससी: HDFC0004989, बँक शाखा: कांजुरमार्ग, मुंबई. **अधिक माहितीसाठी किंवा आमच्या वितरकांसंबंधी माहितीसाठी wecare@bajajfinserv.in वर ई-मेल करा किंवा +९१ ८६९८०१०१०१ वर फोन करा.**

अधिक माहितीसाठी आणि गुंतवणूक करण्यासाठी स्कॅन करा.

# एका विदाचोरीसाठी २५.५ कोटींचा भुर्दंड

## 'आयबीएम'च्या अहवालातील वास्तव; गेल्या वर्षभरात १५.९ टक्के वाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** देशात मागील काही वर्षांत विदाचोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. एका विदाचोरीच्या घटनेसाठी सरासरी २५.५ कोटी रुपयांचा भुर्दंड कंपन्यांना बसत असल्याचे 'आयबीएम'च्या ताज्या अहवालातून समोर आले आहे. गेल्या वर्षी हा सरासरी भुर्दंड २२ कोटी रुपये होता आणि त्यात आता सुमारे १५ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे.

'आयबीएम'ने ६०२ कंपन्यांकडील मार्च २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीतील विदाचोरीच्या घटनांचे विश्लेषण केले. त्यानंतर यातील ४५६ कंपन्यांबरोबर या वर्षी मे महिन्यात अभ्यास करून हा अहवाल जाहीर करण्यात आला आहे. या अहवालानुसार, गेल्या वर्षभरात विदाचोरीच्या ३९ हजार ५०० घटना घडल्या आहेत. त्याआधीच्या वर्षात अशा ३८ हजार २०० घटना घडल्या होत्या. कृत्रिम प्रज्ञा (एआय) तंत्रज्ञानाधारित विदाचोरीचे प्रकार वाढू लागले. विदाचोरीच्या घटनांमध्ये 'एआय' आधारे झालेले २६ टक्के प्रकार आहेत. 'एआय'मुळे सायबर हल्ले अधिक जलद आणि व्यापक पातळीवर होत आहेत. 'एआय'मुळे सायबर हल्ल्यांचे स्वरूप बदलू लागले आहे. याच वेळी या तंत्रज्ञानाच्या मदतीने कंपन्यांकडून सायबर सुरक्षा भक्कम केली जात आहे.

विदाचोरीच्या घटनेनंतर ७३ टक्के कंपन्यांनी सुरक्षा साधनांसाठी गुंतवणूक वाढविण्याचे जाहीर केले आहे. याचबरोबर प्रशासनात सुधारणा करण्यावर भर देण्याची भूमिका कंपन्यांनी घेतली आहे.

''एआय' आणि स्वयंचलित सुरक्षा यंत्रणेचा वापर केवळ ३२ टक्के कंपन्यांकडून होत असून, ३६ टक्के कंपन्या 'एआय'चा मर्यादित वापर करीत आहेत. याच वेळी ३२ टक्के कंपन्यांकडून 'एआय'चा वापरच होत नाही.

सुरक्षा यंत्रणेत 'एआय' आणि स्वयंचलित यंत्रणेचा वापर नसलेल्या कंपन्यांना एका विदा चोरीसाठी ३१.६ कोटी रुपयांचा भुर्दंड बसत आहे. याच वेळी 'एआय'चा वापर करणाऱ्या कंपन्यांना २१.३ कोटी रुपयांचा भुर्दंड बसत आहे,' असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.



### वित्तीय कंपन्यांना सर्वाधिक फटका

विदाचोरीचा सर्वाधिक फटका वित्तीय सेवा क्षेत्रातील कंपन्यांना बसत आहे. एका विदाचोरीसाठी वित्तीय कंपन्यांना ४०.९ कोटी रुपयांचा भुर्दंड बसतो. त्याखालोखाल तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांसाठी ३५.७ कोटी रुपये आणि दळणवळण क्षेत्रातील कंपन्यांसाठी ३४.५ कोटी रुपयांचा भुर्दंड बसतो, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

भारताकडून 'एआय'च्या स्वीकाराला गती मिळाली असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणात नावीन्यतेच्या संधी उपलब्ध होत आहेत. 'एआय'चा वापर करणाऱ्या आणि भक्कम प्रशासन असलेल्या कंपन्या सायबर हल्ले रोखण्यासाठी अधिक सक्षम आहेत. सध्या अनेक कंपन्यांकडून मर्यादित स्वरुपात 'एआय'चा वापर केला जात असून, त्यात सायबर हल्ले शोधण्यावर अधिक भर दिला जात आहे. मात्र, स्पर्धात्मकतेत टिकून राहण्यासाठी भारतीय कंपन्यांना व्यवसायात 'एआय'चा अधिकाधिक वापर करावा लागेल. **- गौरव अगरवाल,** उपाध्यक्ष, 'आयबीएम' इंडिया व दक्षिण आशिया



पोलिसांनी जप्त केलेली वाहने सातारा रस्त्यावर भारती विद्यापीठ पोलिस स्थानकासमोरील पदपथावर दीर्घ काळापासून पडून आहेत. नागरिकांना या पदपथांचा वापर त्यामुळे करता येत नाही. (छाया - पवन खेंगरे)

# व्यावसायिक महाविद्यालयांची शुल्कवाढ बेकायदा असल्याचा आरोप

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) सुधारणा अधिनियमामधील तरतुदींचे उल्लंघन करून ३१ मार्चनंतर २६ बैठका घेत राज्यातील १२७२ विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयांच्या शुल्कवाढीला मंजुरी दिल्याचा आरोप युवा सेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी केला आहे. या शुल्कवाढीमुळे लाखो पालक, विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याने ही बेकायदा शुल्कवाढ करण्याची मागणीही त्यांनी केली.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव वेणुगोपाल रेड्डी यांना या मागणीचे निवेदन यादव यांनी दिले आहे.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'एफआरए'च्या समितीची चौकशी लावल्यानंतरही ही बेकायदा शुल्कवाढ झाली आहे. 'एफआरए'च्या सुधारित कायद्यानुसार महाविद्यालयांच्या शुल्क प्रस्तावांवरील पुनर्विलोकन अर्जांवर शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी, ३१ मार्चपूर्वी निर्णय घेणे बंधनकारक असताना २७ एप्रिल ते २७ जुलै २०२६ या कालावधीत एफआरएने २६ बैठका घेऊन बेकायदा शुल्कवाढीला मंजुरी दिली. त्यामुळे या बैठका, त्यातील निर्णय बेकायदा असल्याचे यादव यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# कल्याणीनगरमध्ये 'जिम'मध्ये आग

**पुणे :** कल्याणीनगर भागातील एका व्यायामशाळेत (जिम) आग लागल्याची घटना सोमवारी सकाळी घडली. जिममध्ये कोणी नसल्याने गंभीर दुर्घटना टळली. अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली.

कल्याणीनगर भागातील जिममध्ये सोमवारी पहाटे पावणेसहाच्या सुमारास धूर येत असल्याची माहिती अग्निशामक दलाच्या येरवडा आणि नायडू रुग्णालय केंद्राला मिळाली. त्यानंतर घटनास्थळी दोन बंब दाखल झाले. तीन मजली इमारतीत दुसऱ्या मजल्यावर असलेल्या जिममध्ये आग लागल्याने मोठ्या प्रमाणावर धूर झाला. जिममध्ये कोणी अडकले नसल्याची खात्री जवानांनी केली. त्यानंतर जवानांनी धूर बाहेर काढण्यासाठी एक्झॉट ब्लोअर यंत्रणेचा वापर केला. पाण्याचा मारा करून २० मिनिटांत आग आटोक्यात आणली. आगीत वातानुकूलन यंत्रणा, इलेक्ट्रिक साहित्य, छत, तसेच अन्य साहित्य जळाले.

# सार्वजनिक स्वच्छतागृहाला गळती

## सजग नागरिक मंचाकडून चौकशीची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** म्हात्रे पुलाजवळ पुणे महापालिकेने सुमारे २६.५ लाख रुपये खर्च करून उभारलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाच्या स्लॅबमधून मोठ्या प्रमाणात गळती होत आहे. तसेच, पहिल्या मजल्यावरील कर्मचाऱ्याच्या (केअरटेकर) खोलीत पाणी साचत आहे. या बांधकामात गंभीर त्रुटी असल्याचा आरोप सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केला.

हे स्वच्छतागृह ३६० चौरस फुटांचे असून, त्यासाठी महापालिकेने ७ हजार ३०० रुपये प्रति चौरसफूट इतका खर्च केला आहे. या कामासाठी महापालिकेच्या अभियंत्यांनी पूर्वगणनपत्रक तब्बल १० हजार रुपये प्रति चौरस फूट दराने तयार केले. या ठिकाणी इतक्या मोठ्या खर्चाची आवश्यकता नसतानाही मोठ्या रकमेचे पूर्वगणनपत्र तयार करण्यात आल्याचा आरोप वेलणकर यांनी केला.

हे स्वच्छतागृह २०२४ मध्ये पूर्ण झाले. मात्र, ते दीर्घ काळ वापरात आले नाही. त्यानंतर देखभाल दुरुस्ती करणाऱ्यांसाठी या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर स्वतंत्र खोली उभारण्यासाठी महापालिकेने आणखी सुमारे १० लाख रुपये खर्च केले आहेत. एवढा खर्च करूनही नव्याने बांधलेल्या स्लॅबला गळती लागल्याने करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी झाली आहे, अशी टीका त्यांनी केली. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्त करावी, त्याला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणीही वेलणकर यांनी केली आहे.

# पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी पुन्हा मुदतवाढ

## १६ ऑगस्टपर्यंत नवी मुदत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार भूसंपादनासाठी १६ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. दरम्यान, ९२ टक्के शेतकऱ्यांनी भूसंपादन करण्यास आवश्यक संमतिपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे दिली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील भूसंपादन करण्यात येणार आहे. विमानतळासाठी १ हजार २१६ हेक्टर जमीन आवश्यक असून, सात मे पासून शेतकऱ्यांकडून संमतिपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. यापूर्वीही भूसंपादनाला तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली. सध्या ९२ टक्के शेतकऱ्यांनी जमीन देण्यास संमती दिली असून, उर्वरित शेतकऱ्यांकडून प्रतिज्ञापत्रे मिळालेली नाहीत. त्या शेतकऱ्यांची संमती देण्याची तयारी असली, तरी काही वैयक्तिक कारणास्तव, वादविवादामुळे संमती देण्यास उशीर होत आहे.

मात्र, त्या शेतकऱ्यांना सरकारने दिलेला योग्य मोबदला मिळावा. तसेच, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी ही मुदतवाढ देण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. 'काही जागांसंदर्भात कौटुंबिक वाद आहेत. ते येत्या काही दिवसांमध्ये संपुष्टात येतील. आतापर्यंत १ हजार २१६ हेक्टरपैकी १ हजार १२५ हेक्टर अर्थात ९२.५ टक्के जमिनीची संमती मिळाली असल्यामुळे ही जागा जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात येईल.

# बुलेटचालकांविरुद्ध कारवाई; काळेपडळ परिसरात ११ दुचाकी जप्त

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सायलेन्सरमधून फटाक्यासारखा आवाज काढणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध हडपसरमधील काळेपडळ पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. रात्री अपरात्री फटाक्याचा आवाज काढणाऱ्या बुलेटचालकांच्या त्रासामुळे नागरिक हैराण झाले होते. पोलिसांनी बुलेट, तसेच दुचाकीचालकांविरुद्ध थेट गुन्हे दाखल करून ११ दुचाकी जप्त केल्या.

काळेपडळ परिसरातील कडनगर चौक, महंमदवाडी, उंड्री, रहेजा व्हिस्टा चौक परिसरात रात्री अपरात्री भरधाव दुचाकी, बुलेटचालक जात असून फटाक्यासारखे आवाज काढण्यात येत असल्याची तक्रार नागरिकांनी पोलिसांकडे केली. सहायक पोलीस फौजदार राजस शेख, हवालदार प्रवीण काळभोर, महादेव शिंदे, गिरिराज जगदाळे यांनी बुलेटचालक, तसेच दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई केली. १८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

परिमंडळ सहाचे पोलीस उपायुक्त जीवन बेनीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीषा निंबाळकर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अण्णासाहेब बाबर, सहायक निरीक्षक विलास सुतार, राजस शेख, प्रवीण काळभोर, अमोल फडतरे यांनी ही कारवाई केली.

# सरदार सरोवर प्रकल्पातील विस्थापितांचे हालच

## प्रकल्पाच्या पुनर्मूल्यांकनासाठी स्थापन करण्यात आलेल्या जनआयोगाचे निरीक्षण

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** 'नर्मदा खोऱ्यातील सरदार सरोवर प्रकल्पाला ४५ वर्षे पूर्ण झाली. मात्र, महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेशातील हजारो कुटुंबांचे पुनर्वसन अपूर्ण आहे. विस्थापितांचे अद्यापही हालच होत असून, या प्रकल्पामुळे अपेक्षित फायदेही मिळाले नाहीत,' असे निरीक्षण सरदार सरोवर प्रकल्पाच्या पुनर्मूल्यांकनासाठी स्थापन करण्यात आलेल्या जनआयोगाच्या अहवालात नोंदवले आहे. या अहवालाचे प्रकाशन सोमवारी शहरात पत्रकार भवन येथे करण्यात आले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या साधना दधिच, सुनीती सु.र., नरेंद्र चुग, मांगल्या पावरा, सियाराम पाडवी, सुजय मोरे आदी या वेळी उपस्थित होते.

जलबिरादारी महाराष्ट्र, हिमधारा हिमाचल प्रदेश आणि ओडिशा येथील डेव्हलपमेंट रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थांनी सरदार सरोवर प्रकल्पाचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी जनआयोगाची स्थापना केली होती.

निवृत्त न्यायाधीश अंजना प्रकाश, मानवाधिकार कार्यकर्त्या ईनाक्षी गांगुली आणि डॉ. गोकेल चक्रवर्ती यांनी आयोगाचे सदस्य म्हणून काम केले. त्यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये नर्मदा खोऱ्यातील १४ ठिकाणांना भेटी देऊन, बाधित नागरिकांच्या साक्षी, तज्ज्ञांची मते, सरकारी कागदपत्रे, न्यायालयीन निर्णय आणि इतर पुराव्यांचा अभ्यास करून अहवाल तयार केला.

निवृत्त न्यायाधीश अंजना प्रकाश या ऑनलाइन पद्धतीने सहभागी झाल्या. मांगल्या पावरा, सियाराम पाडवी या प्रकल्पग्रस्तांनी अनुभव सांगितले. सुजय मोरेंनी सूत्रसंचलन केले. संतोष ललवाणी यांनी आभार मानले.

### अहवालातील ठळक मुद्दे

- महाराष्ट्र आणि गुजरातमधील शेकडो, तर मध्य प्रदेशातील हजारो कुटुंबे अजूनही विस्थापित आहेत.
- पुनर्वसन झालेल्या अनेक वसाहतींमध्ये पाणी, रस्ते, आरोग्य केंद्र, स्मशानभूमीसारख्या पायाभूत सुविधा नाहीत. हा नर्मदा न्यायाधिकरणाच्या निर्णयाचा भंग आहे.
- मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने २००९ साली नेमलेल्या झा आयोगाने १८६ अधिकारी दोषी ठरवले. मात्र, त्यांच्यावर कारवाई झाली नाही.
- या प्रकल्पाला १९८३ मध्ये ४ हजार २०० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. त्यात पुनर्वसन आणि पर्यावरणाचा खर्च गृहित धरण्यात आला नव्हता. आता प्रकल्पाचा खर्च ७५ हजार कोटी रुपयांहून अधिक झाला आहे.

### आयोगाच्या शिफारसी

- सरदार सरोवर प्रकल्पाचे स्वतंत्र सामाजिक, पर्यावरणीय व आर्थिक पुनर्मूल्यांकन करावे.
- विकासाच्या संकल्पनेवर फेरविचार करावा.
- कायद्यानुसार सर्व विस्थापितांचे पुनर्वसन तातडीने पूर्ण करावे. त्यासाठी राष्ट्रीय विस्थापित पुनर्वसन आयोगाची स्थापन करण्यात यावी.
- पुनर्वसन पूर्ण होईपर्यंत प्रलंबित दावे निकाली काढण्यासह सर्व पात्र बाधितांना न्याय्य भरपाई द्यावी.
- तक्रार निवारण यंत्रणा प्रभावी करण्यात यावी.
- नर्मदा नदीतील अवैध वाळू उपसा तातडीने थांबवण्यात यावा.
- कच्छ-सौराष्ट्रसारख्या पाणीटंचाईच्या भागांना प्राधान्याने पाणी द्यावे.


# बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961

**नोंदणीकृत कार्यालयः** आकुर्डी, पुणे -४११०३५

कॉर्पोरेट कार्यालयः ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११०१४

## मुदत ठेव योजना

CRISIL AAA/स्टेबल आणि (ICRA)AAA (स्टेबल) रेटिंग

या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

**ट्रस्ट, सोसायटी, संघटना आणि क्लब द्वारे ₹३ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (१ मे २०२६ पासून लागू) वैध आहे.**

नवीन ग्राहकांसाठी:

ट्रस्ट, सोसायटी, संघटना आणि क्लबसाठी मुदत ठेव वार्षिक व्याजदर ₹३ कोटी (१ मे २०२६ पासून लागू)पर्यंतच्या ठेवींसाठी वैध

तक्ता १

| नियमित कालावधी | संचयी | बिगर- संचयी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मुदत पुर्तीला | मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
| १२ - २३ महिने | ६.८०% | ६.६०% | ६.६३% | ६.६९% | ६.८०% |
| २४ - ३५ महिने | ७.१०% | ६.८८% | ६.९२% | ६.९८% | ७.१०% |
| ३६ - ६० महिने | ७.०५% | ६.८३% | ६.८७% | ६.९३% | ७.०५% |

क) ठेवीचा किमान आकार हा ₹१५,०००/- राहिल.

ख) ₹३ कोटींहून जास्त रकमेच्या प्रत्येक घाऊक ठेवीसाठी प्रकाशित झालेल्या कार्ड दराहून व्याज दर भिन्न असू शकतो आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने विनिर्दिष्ट केलेल्या व्याज दराच्या मर्यादेमध्ये प्रत्येक प्रकरणानुसार ठरवला जाईल.

ग) परिपक्वतेच्या तारखेपूर्वी विहित कालावधीमध्ये नूतनीकरणाची विनंती प्राप्त न झाल्यास परिपक्वतेच्या तारखेला कंपनी ठेवीची रक्कम परत करेल. ठेवीच्या अर्जामध्ये ठेवीदाराने नमूद केलेल्या बँक खात्यामध्ये एनईएफटी किंवा आरटीजीएस किंवा धनादेशाने (एनईएफटी/आरटीजीएस नाकारले गेल्यास) प्रदान केले जाईल.

घ) ठेवीचे (किंवा त्यातील काही भागाचे) नूतनीकरण करण्याची विनंती ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेपूर्वी कामकाजाच्या निदान २४ तास आधी, कंपनीच्या जवळच्या शाखेला भेट देऊन किंवा टपाल, स्वतंत्र आर्थिक सल्लागार किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे लेखी विनंती पाठवून केली जाऊ शकते, ज्यायोगे कंपनीला देय तारखेला प्रकरणानुसार ठेवीची (किंवा त्यातील काही भागाची) परतफेड आणि/किंवा नूतनीकरण करता येईल. वर नमूद केलेल्या कालावधीनंतर ठेवीच्या नूतनीकरणाच्या कोणत्याही विनंत्या स्वीकारल्या जाणार नाहीत. नूतनीकरणाच्या विनंतीसह सर्व ठेवीदारांनी योग्य प्रकारे भरलेला आणि स्वाक्षरी केलेला ठेवीच्या अर्जाचा फॉर्म असणे आवश्यक आहे. ठेवीचे नूतनीकरण हे नूतनीकरणाच्या तारखेला असलेल्या व्याज दर आणि इतर अटी आणि शर्तीनुसार होईल. ठेवींच्या नूतनीकरणाच्या वेळी विद्यमान ठेवीचा एफडीआर आवश्यक नसेल कारण परिपक्वतेच्या तारखेनंतर तो रद्दबातल होईल.

ड) जर ग्राहकाने अर्जाद्वारे नूतनीकरणाचा पर्याय निवडला असेल परंतु त्यानंतर त्याला नूतनीकरण करायचे नसेल तर त्यासंबंधीचा लिखित अर्ज कंपनीकडे नूतनीकरण तारखेच्या निदान २४ तास आधी पोहोचला पाहिजे. हा अर्ज सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे देता येईल. मुदत पूर्तीच्या दिवसानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दुरूस्ती झालेल्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज अँड मिस्लेनिअस नॉन-बँकिंग कंपनीज (जाहिरात) नियम, १९७७ नुसार द्यावयाचा तपशील.

**क. कंपनीचे नाव: बजाज फायनान्स लि.**

**ख. गठित केले गेल्याचा दिनांक: 25 मार्च, 1987**

**ग. प्रॉफिटस्/डिव्हिडंडस्:**

वरील वर्षांच्या संबंधात, जाहिरातीची तारीख आणि कंपनीद्वारे घोषित लाभांशाच्या तत्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांसाठी, कराची तरतुद करण्याआधी व नंतर कंपनीचा नफा.

(₹ कोटींमध्ये)

| आर्थिक वर्ष रोजी संपले | नफा (स्टँडअलोन) कर-पूर्व | कर-पश्चात | लाभांश % |
|---|---|---|---|
| ३१.०३.२०२४ | १७,०५३.०८ | १२,६४४.११ | १८०० |
| ३१.०३.२०२५ | २१,६७६.०९ | १६,६६१.५० | २२०० |
| ३१.०३.२०२६ | २३,६७१.९० | १७,८०३.८७ | ६०० |

**घ ड. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात तपशील:**

संचालक मंडळाचे नियंत्रण व देखरेख यांच्या अधीन राहून व्यवस्थापकीय संचालक कंपनीचे व्यवस्थापन पाहतात. कंपनीचा व्यापार-उदीम आणि इतर बाबी यांच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकीय संचालकाना आवश्यक ते अधिकार प्रदान केलेले आहेत.

**च. संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसाय:**

| नाव | पत्ता | व्यवसाय |
|---|---|---|
| श्री. संजीव बजाज (अध्यक्ष) | प्लॉट क्र.५९,लेन क्र.३ कोरेगांव पार्क, पुणे सिटी - ४११००१. | उद्योगपती |
| श्री. राजीव जैन, (उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक) | डी-२, आयव्ही ग्लेन, मॅरीगोल्ड प्रिमायसेस, कल्याणी नगर, पुणे - ४११०१४. | नोकरी |
| श्री. राजीव बजाज | ३४/३५, लेन क्र. २ कोरेगाव पार्क, पुणे, महाराष्ट्र, भारत - ४११०३५. | उद्योगपती |
| डॉ नौशाद फोर्ब्स | ७४ कोरेगाव पार्क, लेन क्र.३, पुणे - ४११ ००१. | व्यवसाय |
| श्री अनामी रॉय | ६२ सागर तरंग, खान अब्दुल गफार खान रोड, वरळी सी फेस, वरळी, मुंबई ४०० ०३०. | सेवानिवृत्त सनदी सेवक |
| श्री प्रमीत झवेरी | २१ सी, वूडलँड्स, पेडर रोड, कंबाला हिल, मुंबई - ४०० ०२६. | व्यवसाय |
| श्रीमती राधिका हरिभक्ती | ५१, मेकर टॉवर बी, कफ परेड, मुंबई - ४०० ००५. | आर्थिक सल्लागार / व्यावसायिक संचालक |
| डॉ. अरिंदम भट्टाचार्य | एल१/४, २रा मजला, हौस खाझ, नवी दिल्ली - ११० ०१६. | व्यावसायिक |
| श्री. तरुण बजाज | बंगला क्र.३८, नवीन मोती बाग, नवी दिल्ली - ११० ०२१. | स्वतंत्र सल्लागार |
| श्री. अजय कुमार चौधरी | फ्लॅट क्र.१३०४, १३वा मजला, क्रेसेंट बे टॉवर क्र.६, जेरबाई वाडीया रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२. | व्यावसायिक |

**च. सर्वात अलिकडच्या दोन लेखा-परिक्षित बॅलन्स-शीटमध्ये दिसणारा कंपनीचा (स्टँडअलोन) आर्थिक स्थिती सारांश**

(₹ कोटींमध्ये)

| | ३१ मार्च २०२६ रोजी | ३१ मार्च २०२५ रोजी |
|---|---|---|
| **मालमत्ता** | | |
| **आर्थिक मालमत्ता** | | |
| रोख व रोख समकक्ष | १,६३३.८८ | ३,३७४.४१ |
| रोख आणि रोख समकक्षांव्यतिरिक्त बँक बॅलन्स | ११,४७१.९४ | ९,०८०.९८ |
| व्युत्पन्न आर्थिक साधने(डेरीवेटीव्ह फायनान्शियल इंस्ट्रुमेंट्स) | २,३८५.१६ | २०१.९७ |
| व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स) | १,५७५.७६ | १,४१६.३९ |
| कर्जे | ३,६७,२२५.९६ | ३,०४,३५९.१६ |
| गुंतवणूकी | ३८,०७४.३७ | ४१,७१६.२३ |
| इतर आर्थिक मालमत्ता | ४,१७२.७३ | २,४२६.९२ |
| **एकूण आर्थिक मालमत्ता** | **४,२६,५३९.८०** | **३,६२,५७६.०६** |
| **बिगर-आर्थिक मालमत्ता** | | |
| सध्याची कर मालमत्ता (निव्वळ) | २०२.०८ | ४०४.५७ |
| स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | १,४३०.४४ | १,०४४.१४ |
| प्रॉपर्टी, प्लान्ट आणि इक्विपमेंट | २,६८०.६१ | २,५३१.५१ |
| भांडवल काम प्रगतीपथावर | ६१.८३ | २६.७४ |
| विकासा अंतर्गत अमूर्त मालमत्ता | ५७.४३ | १२.४६ |
| अमूर्त मालमत्ता | १,०४३.६९ | १,०४३.१४ |
| इतर बिगर-आर्थिक मालमत्ता | १८७.४३ | २३०.९४ |
| **एकूण बिगर-आर्थिक मालमत्ता** | **५,६६३.५१** | **५,२९३.५०** |
| **एकूण मालमत्ता** | **४,३२,२०३.३१** | **३,६७,८६९.५६** |
| **देणी व इक्विटी** | | |
| **देणी** | | |
| **आर्थिक देणी** | | |
| व्युत्पन्न आर्थिक साधने देय | - | २५.५३ |
| व्यापार देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | ०.९१ | १.२७ |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | १,२८०.५० | १,११९.८४ |
| इतर देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | ०.३३ | ०.४२ |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | ९९४.९५ | ८०६.१९ |
| कर्जाच्या सिक्युरिटीज | १,३३,५२७.०८ | १,११,०१०.८८ |
| उधारी (कर्ज रोखे वगळता) | १,१८,०००.४५ | ८९,७३७.६६ |
| ठेवी | ६८,४८५.५५ | ७१,३६५.५२ |
| उप-कर्जे | ३,८०५.३१ | ३,१०३.५४ |
| इतर आर्थिक देणी | २,४९६.५० | १,६९०.६४ |
| **एकूण आर्थिक देणी** | **३,२७,५९१.५८** | **२,७८,८६१.४९** |
| **बिगर-आर्थिक देणी** | | |
| सध्याचे कराचे देणे (निव्वळ) | १७५.५४ | ५४.९७ |
| तरतुदी | ६७३.२६ | ४६४.२७ |
| इतर बिगर-आर्थिक देणी | ६४०.५९ | ४९३.१२ |
| **एकूण बिगर-आर्थिक देणी** | **१,४८९.३९** | **१,०१२.३६** |
| **इक्विटी** | | |
| इक्विटी शेअर भांडवल | ६२१.७९ | १२४.१७ |
| इतर इक्विटी | १,०२,५००.५५ | ८७,८७१.५४ |
| **एकूण इक्विटी** | **१,०३,१२२.३४** | **८७,९९५.७१** |
| **एकूण देणी व इक्विटी** | **४,३२,२०३.३१** | **३,६७,८६९.५६** |

**आकस्मिक देणी (स्टँडअलोन)**

| तपशील | ३१ मार्च २०२६ रोजी | ३१ मार्च २०२५ रोजी |
|---|---|---|
| कर्ज म्हणून गणले जात नाहीत असे कंपनीविरूद्धचे विवादाचे दावे | १५३.९० | १४१.२० |
| अपील अंतर्गत पीएफ बाबी | ११०.७६ | ११०.७६ |
| अपील अंतर्गत वॅट बाबी | ४.३१ | ४.३१ |
| अपील अंतर्गत ईएसआय बाबी | ५.१४ | ५.१४ |
| बँक हमी | ०.५० | ०.५० |
| अपील अंतर्गत जीएसटी / सेवा कर बाबी | | |
| - व्याज सबसिडीवर | २,५५२.२० | २,४२२.९२ |
| - गुंतवणुकीच्या क्रियाकलापावरील क्रेडिटच्या अतिरीक्त प्रवर्तनावर | ६५८.५७ | ६३०.३२ |
| - आगाऊ वसूल केलेल्या व्याजावर | ९३६.२२ | ८७४.७९ |
| - दंडव्याज/ चार्जेस यांवर | - | - |
| - ग्राहकाने क्रेडिट नोटवर इनपुट टॅक्स क्रेडिट परत केल्यावर | २२.९९ | १४.१३ |
| - जास्तीच्या दाव्यावर आयटीसी आणि जीएसटीआर-१ विरुद्ध जीएसटीआर ३बी मधील फरक | ३२.४२ | ३३.२९ |
| - इतरांबाबत | ४.७७ | १५.४८ |
| प्राप्तीकराच्या बाबीः | | |
| - कंपनीद्वारे केली गेलेली अपिल्स | १५९.२७ | ७२.६१ |
| - प्राप्तीकर विभागाने केलेली अपिल्स | - | - |

**छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज अ‍ॅक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिटस् (रिझर्व बँक) डायरेक्शन्स, २०२५ यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे : १,४३,६२६.९१ कोटी**

**ख) प्रत्यक्षात ३१.०३.२०२६ रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम खालीलप्रमाणे आहे :**

**(I) सार्वजनिक ठेवी : ३९,३७९.७३ कोटी**

**(ii) सार्वजनिक ठेवींव्यतिरिक्त : २९,१०५.८२ कोटी**

**ज.** ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वारस्य अशा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार-उदीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर-निधी स्वरुपाची एकूण येणी (ड्यूज) ही १४६.४२ कोटी इतकी आहेत (बजाज हौसिंग फिनान्स लि. - ०.८९ कोटी, बजाज लाईफ इन्शुरन्स कंपनी लि. - ६९.७६ कोटी, बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लि. - १२.८६ कोटी, बजाज फिन्सर्व हेल्थ लि. - ३०.६८ कोटी, बजाज ऑटो लि. - २५.३६ कोटी, बजाज इलेक्ट्रीकल्स लि. - ०.८० कोटी, बजाज फिनान्शियल सेक्युरिटीज लि. - ०.१० कोटी, बजाज फिनसर्व्ह डायरेक्ट लि. - ०.३९ कोटी, बजाज ऑटो टेक्नॉलॉजी लि. - २.२९ कोटी, बजाज ऑटो क्रेडिट लि. - ०.९३ कोटी, पेनंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. - १.०६ कोटी, बजाज फिनसर्व्ह लि. - १.३० कोटी).

**झ.** ज्याबाबत दावा केला गेला नाही त्याशिवाय इतर कोणत्याही देण्याची वेळ टळून गेलेल्या (ओव्हरड्यू) ठेवी कंपनीकडे नाहीत.

**ञ.** कंपनी खालीलप्रमाणे घोषित करीत आहेः

I) आपल्याला लागू असलेल्या निर्देशांच्या तरतुदींचे पालन कंपनीने केलेले आहे.

ii) निर्देशांची पूर्तता होण्यामुळे, रिझर्व बँक ऑफ इंडियाने ठेवी परत देण्याची (रिपेमेंट) हमी घेतली आहे असे सूचित होत नाही

iii) कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी ह्या सुरक्षित नाहीत (अनसिक्युअर्ड आहेत) आणि इतर अनसिक्युअर्ड देण्यांच्याच श्रेणीत त्या गणल्या जातात.

iv) कंपनीने विनंती केली आहे त्या ठेवींचा विमा उतरवलेला नाही.

v) अर्जाच्या प्रपत्रात प्रकट केली आहे ती कंपनीची आर्थिक स्थिती व त्यातील निवेदने ही खरी आणि अचूक आहेत. त्यातील अचूकता आणि सत्यता यासाठी कंपनी आणि तिचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. कंपनीची आर्थिक कृती-कार्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाद्वारे नियंत्रित केली जातात. तथापि, हे स्वच्छपणे समजून घेतलेच पाहिजे की कंपनीच्या आर्थिक भक्कमतेसाठी किंवा कोणत्याही निवेदनांच्या अचूकतेसाठी किंवा कंपनीद्वारे मांडल्या गेलेल्या भूमिका किंवा व्यक्त केलेली मते आणि ठेवी परत देण्याची / देणी चुकवण्याची कंपनीची स्थिती याबाबतची कोणतीही जबाबदारी रिजर्व बँक ऑफ इंडिया घेत नाही.

**ट.** ठेवी ह्या, अर्जाच्या प्रपत्रात दिलेल्या अटी व शर्तींच्याही अधीन राहतील.

**ठ.** रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या त्या संदर्भातील नियमनांच्या अधीन राहून मुदतीच्या अंतिम दिनांकापूर्वी ठेवी काढून घेता येऊ शकतील. कृपया नोंद घ्या की मुदतीआधी ठेव काढून घेणे (मृत्यूच्या केसेसचा समावेश) हे खालील अटींच्या अधीन राहिल

क) ठेवीच्या तारखेपासून ३ (तीन) महिन्यांपर्यंत: ठेव काढण्याची परवानगी नाही. तथापि:

i) ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास, कंपनी हयात असलेल्या ठेवीदाराला मुदतीपूर्वीच ठेवीची परतफेड करू शकते (प्रतीक्षा कालावधीचा विचार न करता) (जो संयुक्त धारकांच्या बाबतीत अर्जातील अर्जदारांच्या अनुक्रमात प्रथम असेल त्याप्रमाणे) किंवा प्रकरणाप्रमाणे मृत ठेवीदाराच्या नामनिर्देशित/कायदेशीर वारसांना, हयात ठेवीदार/नामनिर्देशित/कायदेशीर वारसाच्या विनंतीनुसार करू शकते मात्र त्यासाठी कंपनीची खातरजमा होण्यासाठी मृत्यूचा पुरावा आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

ii) जर ठेवीदाराला, आणीबाणीच्या प्रसंगीचा वैद्यकीय खर्च किंवा नैसर्गिक आपत्तींमुळे किंवा संकटांमुळे करावा लागणारा खर्च यांसारख्या तातडीच्या खर्चासाठी त्याची ठेव मुदतपूर्तीपूर्वी काढायची असेल, तर अशी ठेव काही अंशी म्हणजे मुद्दल रकमेच्या ५०% पर्यंत किंवा ५ लाख रुपये यांपैकी जी कमी असेल तेवढी रक्कम मुदतपूर्तीपूर्वी काढण्याची परवानगी आहे. बीएफएलच्या धोरणानुसार अशा प्रकारच्या तातडीच्या खर्चांची पडताळणी/मुल्यांकन केले जेऊ शकते.

iii) अत्यंत गंभीर अवस्थेतील आजारासाठी ठेवीदाराला मुद्दल रकमेच्या १००% पर्यंत रक्कम व्याजाशिवाय देण्यात येईल. या पोटकलमासाठी 'गंभीर आजार' या शब्दाची व्याख्या ही वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आयआरडीएआय (हेल्थ इन्शुरन्स) रूल्स, २०१६ मध्ये दिल्यानुसार व त्याअंतर्गत जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार असेल.

iv) ठेवीदाराने विनंती केल्यास एकूण १०,००० रुपयांपेक्षा जास्त मुद्दल रक्कम नसलेल्या ठेवी (''टायनी डिपॉझिट'') ठेवीदाराला किंवा सर्व ठवींच्या बाबतीत त्याच भूमिकेत प्रथम नाव असलेल्या ठेवीदाराला मुदतपूर्तीपूर्वी व्याजाशिवाय प्रदान केल्या जातील.

ख) ठेवीच्या तारखेपासून ३ (तीन) महिन्यानंतर परंतु ६ (सहा) महिन्यांपूर्वी. ठेव काढण्याची परवानगी दिली जाईल. तथापि, व्याज देय असणार नाही.

ग) ६ (सहा) महिन्यांनंतर परंतु ठेवीच्या परिपक्वता तारखेपूर्वी: ठेव काढण्याची परवानगी दिली जाईल. ज्या कालावधीसाठी ठेव योजना चालू केली आहे त्या कालावधीसाठी निर्दिष्ट केलेल्या दरापेक्षा २% कमी दराने व्याज देय असेल. जर ठेव कालावधीसाठी कोणताही दर निर्दिष्ट केलेला नसल्यास, देय व्याजदर हा कंपनीने देऊ केलेल्या सर्वात कमी दरापेक्षा ३% कमी असेल.

**ड.** असल्यास, शाखांच्या किंवा एककांच्या तपशीलासह कंपनी व तिच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः

१. कंपनी व तिच्या शाखा चालवत असलेला व्यापार-उदीमः

ग्राहकांना अर्थ-पुरवठा करण्याच्या श्रेणीमध्ये यांचा समावेश - वाहन-कर्ज, दीर्घ काल वापरण्याच्या वस्तूंसाठी ग्राहकांना कर्ज, वैयक्तिक कर, मालमत्ता तारण कर्ज, गृह कर्ज, बांधकाम साहित्य खरेदीसाठी कर्ज, लहान व्यवसायासाठी कर्ज, सिक्युरीटीजच्या तारणावर कर्ज आणि पायाभूत सोयी-सवलतींसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) कर्ज. कंपनीच्या शाखा येथे आहेत: आग्रा, अहमदाबाद, अहमदनगर, अजमेर, अकोला, अकोट, अलापुझ्झा, अलाहाबाद, अंबाला, अमरावती, अमरेली, अमृतसर, आणंद, अनंतपूर, आणि अंकलेश्वर, असनसोल, औरंगाबाद, बागलकोट, बंगलोर, बारामती, बार्डोली, बरेली, बडोदा, बार्शी, बेळगाव, बेल्लारी, भंडारा, भडोच, भटिंडा, भावनगर, भिलाई, भिवंडी, भोपाल, भुवनेश्वर, भूज, बिदर, विजापूर, बिकानेर, बिलासपूर, बोकारो, बोलपूर, बोरसाड, कालिकत, चाळीसगाव, चंदिगड, चंद्रपूर, चेन्नई, छिंदवाडा, चिखली, चिपळूण, चित्रदुर्ग, चित्तरंजन, चोपडा, कोचीन, कोईम्बतूर, कडलोर, कटक, दाभोई, दाहोद, दावणगेरे, डेहराडून, देवास, धनबाद, धारापुरम, धारवाड, धुळे, दिंडीगुल, दुर्गापूर, एलुरू, इरोड, गांधीधाम, गोवा, गोकाक, गुलबर्गा, गुना, गुंटूर, ग्वाल्हेर, हलदिया, हलोल, हासन, हावेरी, हिंम्मतनगर होशंगाबाद, होशियारपूर, हॉस्पेट, हुबळी, हैदराबाद, इंदूर, जबलपूर, जगधरी, जयपूर, जालंधर, जळगाव, जलपैगुडी, जम्मू, जामनगर, जामनेर, जमशेदपूर, जोदपूर, जुनागढ, कडी, कैथाल, काकीनाडा, कालका, कन्नूर, कानपूर, कपूरथळा, क-हाड, कराईकुडी, कर्नाल, करुनागापल्ली, करूर, कारवार, कटनी, खामगाव, खांडवा, खडगपूर, कोलार, कोल्हापूर, कोलकाता, कोल्लम, कोपरगाव, कोरबा, कोटा, कोट्टायम, कर्नूल, कुरूक्षेत्र, लातूर, लखनौ, लुधियाना, मच्छलीपट्टम, मदुराई, मंड्या, मंगलोर, म्हापसा, मडगाव, मेहसाणा, मोगा, मोर्वी, मुंबई, म्हैसूर, नभा, नडियाद, नागरकॉईल, नागपूर, नमक्कल, नांदेड, नंदुरबार, नाशिक, नवसारी, नेल्लोर, नवी दिल्ली, पालनपूर, पंढरपूर, पानिपत, पतियाळा, पाटणा, पेण, फगवाडा, पिंपळगाव, पोलाची, पाँडिचेरी, पुणे, पुत्तूर, रायचूर, रायपूर, राजामुंद्री, राजगुरूनगर, राजकोट, राजनांदगाव, राजपुरा, राणाघाट, रांची, रतलाम, रत्नागिरी, रेवा, रोहतक, रोपार, राऊरकेला, सालेम, सांगली, सातारा, सतना, सिहोर, सिमला, शिमोगा, सिलीगुडी, सिरसा, सोलापूर, सुरत, सुरेंद्रनगर, तेनाली, थिरुवल्ला, थिरुनेलवेल्ली, तिरुपती, थिरूपूर, त्रिचूर, त्रिची, त्रिवेंद्रम, तुमाकुरू, तुतीकोरीन, उदयपर, उडिपी, उज्जैन, वडाकारा, बलसाड, वापी, वाराणसी, विदिशा, विजयवाडा, विझाग, विजयानगरम, वणी, वारंगल, वर्धा, वरूड, वाशिम, यवतमाळ आणि www.bajajfinserv.in=> Contact us=>Visit our branch या अधिकृत संकेतस्थळ पानावर नमूद केलेल्या इतर सर्व शाखा किंवा https://www.bajajfinserv.in/branch-locator यावर थेट क्लिक करा.

२. कंपनीच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः

| अ. क्र. | उपकंपनीचे नाव | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कृती-कार्य |
|---|---|---|---|
| 1. | बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | हाउसिंग फायनान्स व्यापार-उदीम |
| 2. | बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | स्टॉक ब्रोकिंग आणि डिपॉझिटरी सहभागी |

**जाहिरातीचा वरील मजकूर हा संचालक मंडळाच्या अधिकाराने व त्यांच्या नावाने जारी केला गेलेला आहे आणि संचालक मंडळाने ३० जुलै २०२६ च्या आपल्या बैठकीत या मजकुराला मान्यता दिलेली आहे आणि मंडळाने अधिकार दिलेले श्री. राजीव जैन, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांनी सही केलेली त्याची एक प्रत नोंदणीसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे पोहचवली गेलेली आहे.**

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
संचालक मंडळाच्या आदेशान्वये

पुणे
३१ जुलै २०२६

श्री. राजीव जैन
उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
DIN: ०१५५०१५८

**गुंतवणूक कशी करावी:**

गुंतवणूक केवळ धनादेश द्वारे, नेटबँकिंग द्वारे होऊ शकते. धनादेश द्वारे गुंतवणूक करत असल्यास Bajaj Finance Ltd. A/c 00070350006738 ह्या नावाने करावी. त्यावर 'अकाऊंट पेयी ओन्ली' असे लिहून तो क्रॉस करावा. धनादेश 'at par' देय असावा व CTS पूर्ततेचा असावा. गुंतवणूक रकमेसह अर्ज प्रपत्र ह बजाज फिनान्स च्या मुदत ठेव वितरकांकडे किंवा बजाज फिनान्स च्या कोणत्याही शाखांकडे द्यावे. नेटबँकिंग द्वारे गुंतवणूक करायची असल्यास ह्या तपशीलाचा वापर करावा: लाभार्थी नावः बजाज फिनान्स लि. मुदत ठेव संकलन खाते, बँक खाते क्र.: BFLFD8 (संख्यात्मक खाते क्र. ECMS संकलन कोड BFLFD8 ने बदलला आहे), बँक खाते प्रकार: करंट खाते, बँकेचे नाव: एचडीएफसी बँक लि., आयएफएससी: HDFC0004989, बँक शाखा: कांजुरमार्ग, मुंबई. **अधिक माहितीसाठी किंवा आमच्या वितरकांसंबंधी माहितीसाठी wecare@bajajfinserv.in वर ई-मेल करा किंवा +९१ ८६९८०१०१०१ वर फोन करा.**